**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कांदे साठवण करण्याचे गोदाम म्हणून कांदाचाळ उभारणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग, रोहयो प्रभाग,**
**शासन निर्णय क्रमांक- फळबाग-२०२३/ प्र.क्र.३२/मग्रारो-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १८ मे, २०२३

वाचा :-

१. शासन निर्णय क्रमांक-फळबाग-२०२१/ प्र.क्र.६३ / मग्रारो-५ दि. ३० मार्च, २०२२
२. केंद्र शासनाचे पत्र क्रमांक १४२५ असाधारण राजपत्रातील भाग - II खंड-३ -उपखंड (ii) नवी दिल्ली दिनांक २४ मार्च, २०२३
३. शासन शुध्दिपत्रक क्र. फळबाग-२०२२/प्र.क्र.४४/मग्रारो-५ दिनांक १५ जुलै, २०२२
४. शासन निर्णय क्रमांक- मग्रारोहयो-२०१०/ प्र.क्र.४७ / रोहयो -१० दि. १३ एप्रिल, २०२३,
५. शासन शुध्दिपत्रक क्र. फळबाग-२०२२/प्र.क्र.४४/मग्रारो-५ दिनांक १५ मे, २०२३

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक - १ मधील शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृत महोत्सवी फळझाड/ वृक्ष लागवड व फूलपिक लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. वाचा येथे नमुद संदर्भ क्रमांक २ अन्वये केंद्र शासनाने दिनांक २४ मार्च २०२३ असाधारण राजपत्रातील भाग -II खंड-३ उपखंड (ii) अन्वये योजनेतील अकुशल मजूरीच्या दरात सुधारणा केली असून दिनांक ०१ एप्रिल, २०२३ पासून महाराष्ट्र राज्याकरीता मजूरीचा दर रुपये २७३/- प्रति मनुष्यदिन याप्रमाणे निश्चित केलेला आहे. कृषी विभागाच्या दिनांक १२.०४.२०२३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांसोबत झालेल्या बैठकीमध्ये कांदाचाळ उभारणी मनरेगा अंतर्गत समाविष्ठ करणेचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते.

२. रांगडा हंगामातील कांदा सुकवून साठविला जाऊ शकतो. परंतु कांदा साठविण्याठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार केलेले गोदाम उपलब्ध नसल्याने खरीप हंगामातील कांदा काढला की लगेच विकावा लागतो. कांद्याचे उत्पादन हंगामात येते. मागणी मात्र वर्षभर सारखीच असते. कांद्याचे पिक निघाल्यावर मागणी नसल्यामुळे बाजारात कांद्याचा भाव पडतो. याचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. काही वेळा शेतकरी कांदा रस्त्यावर टाकल्याची बातमी येते. याचा फटका जनतेला पण पडतो कारण अशा पध्दतीने कांदा फेकला गेल्यावर बाजारात कांद्याचा तुटवडा होऊन तो महाग होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा कांद्याच्या बाजार भावातील चढ-उतार पासून सुरक्षा, स्थानिक बाजारपेठेत योग्य दरात पुरवठा व निर्यातीची मागणी भागविणेसाठी कांदा साठवणूक क्षमता वाढविणे गरजेचे आहे.

३. कांदा ही एक जिवंत वस्तू आहे. तिचे मंदपणे श्वसन चालू असते. तसेच पाण्याचे उत्सर्जन देखील होत असते. त्यामुळे योग्य प्रकारे साठवण न केल्यास कांद्यास ४५-६० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. हे नुकसान प्रामुख्याने वजनातील घट, कांद्याची सड व कोंब येणे इ. कारणांमुळे होते. त्यामुळे कांद्याचे कमीत कमी नुकसान होण्यासाठी कांद्याची शास्त्रोक्त पध्दतीने साठवणूक होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी कांदाचाळच्या माध्यमातून कांदा पिकाची साठवणूक आवश्यक आहे. त्यानुषंगाने कांदा पिकासंदर्भात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कांदा साठवणूक करण्याचे गोदाम म्हणून कांदाचाळ उभारणी विचाराधीन असल्यामुळे शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कांदे साठवण करण्याचे गोदाम म्हणून कांदाचाळ उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. कांदाचाळ संदर्भात मनुष्यदिन संख्या गृहीत धरुन **"परिशिष्ट अ"** प्रमाणे आर्थिक मापदंड निश्चित करण्यात येत आहेत. सद्यस्थितीत मनरेगाचे अनुज्ञेय अकुशल मजूरीचे दर रु.२७३/- अनुसार कांदाचाळ प्रकल्प उभारणीकरीता एकूण लागणारे मनुष्यदिन ३५२.४५ त्यानुसार रु.९६,२२०/- इतकी मजूरी तसेच साहित्यासाठी लागणारा खर्च मजुरीवर होणाऱ्या खर्चाच्या ४० टक्केच्या मर्यादेत रु. ६४,१४७/- इतका खर्च. असा मनरेगा अंतर्गत मजूरी अधिक साहित्याचा खर्च एकूण रु.१,६०,३६७/- (एक लक्ष साठ हजार तीनशे सदुसष्ठ) इतका (मजुरीदर रू. २७३ असल्यावर) अनुज्ञेय आहे. पुढील वित्तीय वर्षात मजुरीचा दर वाढल्यास याच्यात सुद्धा वाढ होईल. उर्वरित रक्कम रु.२,९८,३६३/- इतका निधी लोकवाटा च्या माध्यमातून प्रस्तावित आहे.

**मनरेगासाठी कांदाचाळसाठी अनुज्ञेयता खालीलप्रमाणे -**

**अकुशल** (६०%) - ९६,२२०/-
**कुशल** (४०%) - ६४,१४७/-
**मनरेगा अंतर्गत एकूण** - १,६०,३६७/-
**अतिरिक्त कुशल खर्चासाठी लोकवाटा** - २,९८,३६३/-
**कांदाचाळीसाठी एकूण खर्च - ४,५८,७३०/-**

५. खरीप व रब्बी हंगामामध्ये कांदा पिकाचे उत्पादन होते. राज्यात साधारण १३६.६८ लाख मे. टन इतक्या कांद्याचे उत्पादन घेतले जाते. त्यासाठी साधारणपणे एकूण ९.४५ लाख हे. क्षेत्र कांदा पिकाखाली आहे. कांदा साठवण करण्याचे गोदामासाठी रुंदी - ३.९० मी., लांबी - १२.०० मी. एकूण उंची - २.९५ मी. (जमीनीपासून ते टाय लेवलपर्यंत) याप्रमाणे आकारमान राहील. साधारण ०१ हे. धारण क्षेत्रावर २५ मे. टन कांदा उत्पादन होते. कांदाचाळ वैयक्तिक तसेच सामुदायीकरीत्या शेतकरी याचा लाभ घेऊ शकतात. तसेच गटशेती, महिला बचत गट यांना सामुदायिक लाभ घेता येऊ शकतो.

६. लोकवाटा म्हणजे लाभार्थी स्व:खर्चाने अतिरिक्त कुशलसाठी निधी उपलब्ध करुन देईल किंवा अभिसरणाच्या माध्यमातून मनरेगाशिवाय अन्य निधी याबाबत विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. यामध्ये लोकवाटा म्हणजे जसे की, मनरेगासोबत अन्य विभागांचे अभिसरण केल्यास त्या विभागाच्या अर्थसंकल्पित निधितून अधिक पटीने कामे करता येतील. राज्यशासन तसेच केंद्र शासनाच्या सर्व योजनांचा निधी मनरेगासोबत अभिसरणासाठी वापरता येईल. राज्यातील काही योजनांची नावे उदाहणादाखल खालीलप्रमाणे आहेत. या यादीतील नावे सर्व समावेशक (exhaustive) नाहीत. याशिवाय कोणत्याही योजना, वैयक्तिक सहभाग तसेच लोकसहभागाच्या निधीसुध्दा वापरता येतील. **वित्त आयोग, खासदार आमदार स्थानिक विकास निधी, ग्रामपंचायतींना जनसुविधांकरिता मिळणारे अनुदान, मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी मिळणारे विशेष अनुदान, गौण खनिज विकास निधी/ जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी, ग्रामपंचायतींना मिळणारे महसुली अनुदान, जिल्हा परिषद/पंचायत समिती सेस मधुन उपलब्ध होणारा निधी, ग्रामपंचायतींचे स्व उत्पन्न, पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी (अनुसुचित क्षेत्रातील गावांकरीता), ठक्कर बाप्पा अदिवासी सुधार कार्यक्रम (आदिवासी उपाययोजना गावांकरीता), नाविण्यपूर्ण योजना, इतर जिल्हा योजना, यांसह केंद्र/राज्य शासनाच्या / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अन्य योजना.**

७. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कांदाचाळ उभारणी बाबत विभागाच्या दिनांक ३०.०३.२०२२ तसेच दिनांक १३.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये व दिनांक १५.०५.२०२३ शासन शुध्दीपत्रकान्वये देण्यात आलेले प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार संबंधित यंत्रणांना लागू राहतील. अर्थात, कांदाचाळ उभारण्यासाठी पंचायत, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, पणन विभाग हे सर्व विभाग कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून कार्य करतील.

८. केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या मजूरी दरानुसार अंदाजपत्रके सुधारित करण्याचे निदेश आहेत. त्यानुसार आयुक्त (कृषी) यांनी दरवर्षी सुधारित मजुरी दरानुसार अकुशल आर्थिक मापदंड सुधारित करुन

क्षेत्रीय स्तरावर कळवावेत. यासाठी ज्या कालावधीपासून मजूरी दर लागू केला असेल तोच कालावधी विचारात घेण्यात यावा. राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (DSR) जिल्हा दरसुची नुसार सामुग्रीची दरवाढ करण्यात यावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०५१८१७५५०७३७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDKUMAR VERMA

Digitally signed by NANDKUMAR VERMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DCD3577EBF0E05E2A8B57095C152DC6CFB37C2BB83DA197788645DD8A362EBC5, cn=NANDKUMAR VERMA
Date: 2023.05.18 18:30:42 +05'30'

( नंद कुमार )
अपर मुख्य सचिव (रोहयो)

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
३. मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा व विधान परिषद
४. मा. मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य स्वीय सहायक,
६. अप्पर मुख्य सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंवई-४०००३२
७. प्रधान सचिव (कृषि), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. आयुक्त, (कृषी) महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
११. संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो)
१४. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१५. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), पुणे
१६. सर्व विभागीय कृषी सहसंचालक
१७. सर्व उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, (मग्रारोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय.
१८. निवड नस्ती, कार्यासन रोहयो- ५, नियोजन विभाग, मंत्रालय.